# प्रेसनोट

दिनांक ०१/०८/२०२०

## तलाठी सज्जा चांडोळा ता. मुखेड जि.नांदेड येथील तलाठी उदयकुमार मिसाळे व खाजगी इसम राहुल परांडे यांना ३०,०००/– रुपये लाचेचच्या रक्कमेस रंगेहात नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले

दिनांक २९/०७/२०२० रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, ''यातील लोकसेवक उदयकुमार मिसाळे हे तक्रारदार यांचे मयत वडीलांचे नावार असलेली शेत जमीन तक्रारदार यांचे तसेच त्यांचे भावाचे व बहीनीच्या नावे वारसा हक्काने लावुन फेरफार करण्यासाठी ४०,०००/– रु लाचेची मागणी करीत आहेत''.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन दिनांक ०१/०८/२०२० रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये लोकसेवक मिसाळे यांनी तक्रारदार यांचेकडे उपरोक्त कारणासाठी ४०,०००/– रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०,०००/– रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून आजच दिनांक ०१/०८/२०२० रोजी बजाज गॅलेक्सी, कॅनाल रोड, डी मार्ट रोड, नांदेड परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये लोकसेवक मिसाळे यांनी तक्रारदार यांना खाजगी इसम परांडे यांचेकडे लाचेची रक्कम देण्यास सांगीतल्याने खाजगी इसम परांडे यांनी तक्रारदार यांचेकडुन ३०,०००/– रू. लाचेची रक्कम स्विकाल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून (१) आरोपी लोकसेवक उदयकुमार लक्ष्मणराव मिसाळे, वय ४७ वर्ष, तलाठी सज्जा चांडोळा ता. मुखेड जि. नांदेड रा. सावित्रीबाई फुलेनगर कॅनल रोड नांदेड (२) राहुल प्रल्हादराव परांडे, वय ३५ वर्ष व्यवसाय मजुरी रा. सावित्रीबाई फुलेनगर कॅनल रोड नांदेड यांचे विरूध्द पोलीस स्टेशन भाग्यनगर नांदेड येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक, राहुल पखाले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्रीमती कल्पना बारवकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, पोलीस उप अधिक्षक श्री विजय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल पखाले, पोना बालाजी तेलंगे, गणेश तालकोकुलवार, सचिन गायकवाड, अंकुश गाडेकर, मारोती सोनटक्के यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कंमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन कंमाक :– १०६४ (२) कार्यालयाचा फोन कंमाक ०२४६२–२५३५१२

३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल कंमाक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( राहुल पखाले )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

मा.संपादक, दैनिक ..........................................,

कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात सदर प्रेसनोट प्रसिध्द करावी.

Scanned by CamScanner